**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
५) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.१७/०५/२०२०.
६) या कार्यालयाचे आदेश क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/सुधारीत मार्गदर्शकसूचना/आदेश/कावि-१२६२/२० दि.०२/०६/२०२०.
७) या कार्यालयाचा मनाई आदेश क्र.गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.२५/२० दि.३१/०५/२०२०
८) गृह मंत्रालय भारत सरकार यांच्याकडील आदेश क.४०-३/२०२०-DM-I(A) दि.२९/०६/२०२०.
९) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.२९/०६/२०२०.

---

क्र. गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.३३/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक ३०/०६/२०२०

**आदेश :-**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे आवश्यक असल्याने उपोद्घातातील अ.क्र.७ अन्वये पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक ३०/०६/२०२० पर्यंत निर्गमित करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, सदरहू आदेशान्वये उपोद्घातातील अ.क्र.९ अन्वये राज्यामध्ये दिनांक ३१/०७/२०२० पर्यंत टाळेबंदी (लॉकडाऊन) लागू राहील असे जाहीर केले आहे. त्यामुळे पालघर जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील तरतुदीन्वये आदेश काढणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **पालघर जिल्हयामध्ये दिनांक ०१/०७/२०२० रोजी रात्री १२.०१ ते दिनांक ३१/०७/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे.**

**राज्य शासनाचे उपोद्घातातील अ.क्र.९ च्या आदेशान्वये पालघर जिल्हयामध्ये दिनांक ०१/०७/२०२० रोजी पासून नमूद बाबी निर्बंधासह अनुज्ञेय राहतील.**

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानूसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

कोणत्याही व्यक्तीने सदर आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ ते ६० मधील तरतुदीनुसार व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक ३०/०६/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत :-**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
७) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२) गट विकास अधिकारी पंचायत समिती वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१३) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.
१४) मुख्याधिकारी, नगरपरीषद/ नगरपंचायत पालघर/जव्हार/डहाणू/मोखाडा/विक्रमगड/वाडा/तलासरी यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१५) पालघर जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय/महामंडळे/खाजगी आस्थापना यांना.

जिल्हा दंडाधिकारी पालघर * जिल्हा पालघर *

(डॉ. किरण महाजन)
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**अपर जिल्हादंडाधिकारी पालघर**

(स्थळ प्रतीवर मा.जि.दं. यांची स्वाक्षरी असे)